ओबीसी विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र संस्था असावी, यासाठी आग्रही भूमिका घेत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सारथीलाही पत्र लिहिले होते. तसेच, प्रत्यक्ष भेटीतही त्यांनी फडणवीस यांच्यासोबत या विषयावर चर्चा केली होती.

New Delhi
Page No. 1 Jul 30, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

## 'महाज्योती'ला ३८० कोटी रुपयांचा निधी

# दिल्लीत यूपीएससीच्या तयारीला बळ

उमेश जाधव ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमुळे (महाज्योती) महाराष्ट्रातून दिल्लीत येऊन यूपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पाठबळ मिळेल, असा विश्वास ओबीसी कल्याण विभागाचे मंत्री डॉ. संजय कुटे यांनी 'लोकमत'कडे व्यक्त केला आहे.

अनेक समस्यांचा सामना करत आज दिल्लीत हजारो विद्यार्थी यूपीएससीची तयारी करत आहेत. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी कोणतीही संस्था नसल्यामुळे त्यांना आतापर्यंत विपरीत परिस्थितीत स्वखर्चाने यूपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करावी लागत होती. मात्र, आता 'महाज्योती'च्या माध्यमातून यूपीएससीच्या तयारीसाठी ओबीसी प्रवर्गातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना दिल्लीत पाठवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे त्यांना अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही डॉ. कुटे यांनी यावेळी सांगितले. त्याचप्रमाणे उच्च शिक्षण आणि परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससी यासारख्या स्पर्धा परीक्षांच्या कोचिंगसाठी निधी उपलब्ध करण्यावर 'महाज्योती'च्या माध्यमातून भर देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

'महाज्योती'ला पहिल्या दोन वर्षांसाठी ३८० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुणे येथे या स्वायत्त संस्थेचे मुख्य कार्यालय असणार आहे. तर नागपूर व बुलढाणा येथे विभागीय कार्यालये स्थापन करण्यात येणार आहेत.

### कौशल्य विकासाला प्राधान्य

'महाज्योती' अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण, कौशल्य विकासाला प्राधान्य देण्यात येणार आहे. या संस्थेतर्फे महाराष्ट्रात ज्योतीदूत, जलदूत आणि सावित्रीदूत नेमण्यात येणार आहेत. जलदूतांकडून जलसंवर्धन, जलसिंचन, पाणी व्यवस्थापन याबाबत जनजागृती केली जाणार आहे. स्वच्छता, स्त्री-पुरुष समानतेबाबत सावित्रीदूतांकडून जनजागृती केली जाईल. तर ज्योतीदूतांच्या माध्यमातून जाती आधारित विषमता दूर करणे, हुंडा पद्धतीला विरोध केला जाणार आहे.



"बार्टीकडून २०० तर सारथीकडून २२५ विद्यार्थ्यांना यूपीएससीच्या तयारीसाठी दिल्लीत कोचिंगची सुविधा दिली जाते. मात्र, 'महाज्योती'साठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना दिल्लीत पाठवून कोचिंगची सुविधा देण्यात येईल.

**- डॉ. संजय कुटे**, मंत्री, कामगार व ओबीसी कल्याण विभाग, महाराष्ट्र

New Delhi
Page No. 1 Aug 01, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

## यूपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया

# 'महाज्योती'मुळे ओबीसी विद्यार्थ्यांना दिलासा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : बार्टी, सारथीच्या धर्तीवर इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील युवक, युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम राबवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य सरकारने महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) स्थापन करण्यास नुकतीच मान्यता दिली.

या संस्थेमुळे दिल्लीत यूपीएससीची तयारी करणाऱ्या आणि महाराष्ट्रातही स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली आहे.

'महाज्योती'मुळे ओबीसी प्रवर्गातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असणाऱ्या विद्यार्थ्यांना सुविधा मिळणार असल्यामुळे भविष्यात अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांकडे वळतील, अशी प्रतिक्रिया दिल्लीतील विद्यार्थ्यांनी दिली. विद्यार्थ्यांसाठी, 'सारथी' मराठा व कुणबी समाजातील विद्यार्थ्यांसाठी आहे.

मात्र, ओबीसी, विमुक्त जाती, अद्याप अशी संस्था स्थापन करण्यात आलेली नव्हती. दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश मिळाले असून 'महाज्योती' संस्था स्थापन मिळाली आहे. 'महाज्योती'च्या लढ्याला बळकटी देण्यासाठी झटणाऱ्या दिल्लीतील विद्यार्थ्यांनी 'लोकमत'कडे प्रतिक्रिया व्यक्त



"महाराष्ट्रातील ओबीसी समाज लोकसंख्येने मोठा आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी संख्याही मोठी असल्यामुळे स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी सहाय्य करणारी संस्था आवश्यक होती. 'महाज्योती'मुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही स्पर्धेत उतरण्यासाठी प्रेरणा मिळेल.

**- निखील राठोड**



"घरची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे सी-डॅकसारखे कोर्स करु शकत नव्हतो. मात्र, 'महाज्योती'मुळे या कोर्सचा खर्च सरकार करणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यात उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याचा मार्गही खुला होणार आहे.

**- विवेक नागोसे**



"ग्रामीण भागातून आलो असून दिल्लीत दोन वर्षांपासून यूपीएससीची तयारी करत आहे. 'महाज्योती' या स्वायत्त संस्थेची मदत मिळाली तर यूपीएससी परीक्षेचा अभ्यास सहजपणे करता येईल. महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे उच्च शिक्षणाकडे न वळणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल.

**- अनिकेत स्वामी**



"'महाज्योती'मुळे संशोधन क्षेत्रात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळणार आहे. त्यामुळे ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थी संशोधनाकडे वळतील. त्यामुळे या संस्थेकडून आम्हाला खूप अपेक्षा आहेत.

**- मनोज सुरोश**



"एमपीएससी, एसएससी आणि बँकिंगसारख्या परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी नवीन संस्थेची नक्कीच मदत होणार आहे. सध्या मी एसएससीची तयारी करत आहे. त्यामुळे 'महाज्योती'अंतर्गत परीक्षेच्या तयारीसाठी महाराष्ट्रात जाण्याचीही तयारी आहे.

**- आशिष गोमासे**

**दिनांक १ सप्टेंबर व १६ डिसेंबर २०१९ नवी दिल्ली**

लोकमत

# ‘महाज्योती’साठी मुहूर्त सापडेना

## महाराष्ट्रातील निवडणूक आचारसंहितेमुळे स्थापना रखडणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मराठा-कुणबी वगळता इतर मागासवर्गीय वर्गातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी राज्य सरकारने पाठपुरावा न केल्याने ‘महाज्योती’ संस्थेची रीतसर स्थापना झाली नाही. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता आता लवकरच लागू होणार असल्याने महाज्योतीची स्थापना होण्याची शक्यता मावळली आहे.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना एमपीएससी व यूपीएससीच्या स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन देण्यासाठी अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी बार्टी, मराठा व कुणबी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी सारथी या संस्थांची स्थापना राज्य सरकारने केली आहे. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मात्र मार्गदर्शनाची कोणतीही सुविधा नव्हती. यासाठी दिल्लीत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरु केले. या आंदोलनाची दखल घेऊन राज्य सरकारने महाज्योती संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या संदर्भात महाराष्ट्राचे ओबीसी, व्हीजेएनटी

पान/१०

### मागासवर्गीयांना वंचित ठेवण्याचा डाव

“ राज्यातील १००० विद्यार्थ्यांना या संस्थेमार्फत दिल्लीत स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याची संधी मिळणार आहे. राज्य सरकारचे अधिकारी मात्र कंपनी कायद्याखाली नोंदणी करण्यात टाळाटाळ करीत आहे. हे अनाकलनीय आहे. निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर यात पुढे काहीही होऊ शकणार नाही.

**- उमेश कोरम, विद्यार्थी नेता**

New Delhi
Page No. 1 Sep 18, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

# नोंदणीनंतरही ‘महाज्योती’ला निधीची प्रतीक्षा

## दिल्लीतील यूपीएससीच्या विद्यार्थ्यांची वाढली चिंता

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्लीत यूपीएससीची तयारी करणाऱ्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी बार्टी, सारथीच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारने ‘महाज्योती’ची घोषणा केली. या संस्थेची नोंदणीही झालेली आहे. मात्र, अद्याप निधी मिळाला नसल्याने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची चिंता वाढली आहे.

जानेवारीपर्यंत महाज्योतीची जाहिरात प्रसिद्ध न झाल्याने हजारो विद्यार्थ्यांना त्याचा फटका बसण्याची शक्यता आहे. आर्थिक परिस्थिती नसतानाही दरवर्षी महाराष्ट्रातून हजारो विद्यार्थी यूपीएससीच्या तयारीसाठी दिल्लीत येतात. ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थीही आर्थिक गणित जुळवून दिल्लीत येत होते. त्यांच्याकडून करण्यात आलेली स्वतंत्र संस्थेची मागणी मान्य करण्यात आली. मात्र, महाराष्ट्रातील निवडणुका आणि सत्तांतर यांमुळे ‘महाज्योती’ संस्थेची नोंदणी झाली असली तरी निधी मिळालेला नाही.

युनायटेड ओबीसी स्टुडंट फेडरेशनच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच दिल्लीत महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री नितीन राऊत आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भेट घेतली. राऊत यांनी तातडीने संबंधित विभागाशी संपर्क साधून तोडगा काढण्यास सांगितले आहे.

इतर मागासवर्ग, विशेष मागास आणि विमुक्त व भटक्या जाती कल्याण विभागाचे प्रधान सचिव जे.पी. गुप्ता यांनी पुढील तीन दिवसांत याप्रकरणी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे. महाज्योतीला निधी उपलब्ध करून देण्यासाठी खाते नसल्याची माहिती गुप्ता यांनी दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी व्यवस्थापकीय संचालकांची घोषणा करुन त्यानुसार निधी देण्याची मागणी केली आहे. जानेवारीमध्ये जाहीरात आणि प्रवेश परीक्षा पार पडल्यावरच ओबीसीच्या विद्यार्थ्यांना मार्चपासून सुरु होणाऱ्या पुढील सत्राची तयारी करता येणार आहे. अन्यथा निधी उपलब्ध झाला नाही तर या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाईल.

“ ओबीसीच्या विद्यार्थ्यांच्या मागण्या आम्ही नितीन राऊत यांच्यासमोर मांडल्या आहेत. तसेच, संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशीही चर्चा झाली आहे. मात्र, तातडीने निर्णय झाला तरच विद्यार्थ्यांना लाभ मिळेल.

**- उमेश कोरम, अध्यक्ष, युनायटेड ओबीसी स्टुडंट फेडरेशन**

New Delhi
Page No. 3 Dec 16, 2019
Powered by: erelego.com

# 'महाज्योती'ला निधीची प्रतीक्षा

## विद्यार्थ्यांचे लक्ष नव्या सरकारकडे; मनुष्यबळाचीही वानवा

राजेश्वर ठाकरे, नागपूर

**ओबीसी, व्हीजेएनटी** विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी आणि उच्च शिक्षणासाठी परदेशात जाता यावे, यासाठी महात्मा जोतीराव फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. परंतु ही संस्था अद्याप निधी आणि मनुष्यबळाच्या प्रतीक्षेतच आहे. या दोन्ही गोष्टी मिळाल्याशिवाय संस्थेला पुढील सत्राकरिता सवलतीच्या योजना सुरू करणे अशक्य आहे.

इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील मुला-मुलींसाठी स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षणाठी सवलतीच्या योजना सुरू करता याव्या म्हणून सारथीच्या धर्तीवर महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) स्थापन करण्यात आली. या संस्थेतर्फे राज्य लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगतर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी बार्टी संस्था आहे. मराठा व कुणबी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी सारथी संस्था आहे. त्याच धर्तीवर महात्मा जोतीराव फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागण्यापूर्वी या संस्थेची कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी झाली आहे. या संस्थेचे कार्यालय पुण्यात आहे. महाविकास आघाडी सरकारने या संस्थेसाठी निधीची तरतूद, संस्थेमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय या संस्थेच्या कारभाराला सुरुवात होणार नाही. बार्टी आणि सारथीमार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी साधारणतः फेब्रुवारी महिन्यात जाहिरात प्रसिद्ध केली जाते. राज्य सकारने तातडीने निधी उपलब्ध केल्यास महाज्योतीदेखील फेब्रुवारी महिन्यात जाहिरात प्रसिद्ध करू शकेल आणि विद्यार्थ्यांना चालू सत्रापासून त्याच्या योजनांचा लाभ घेता येऊ शकेल.

महाज्योतीमुळे महाराष्ट्रातील ओबीसी, व्हीजेएनटी प्रवर्गातील एक हजार विद्यार्थ्यांना दिल्लीत स्पर्धा परीक्षेसाठी शिष्यवृत्ती मिळू शकणार आहे. राज्य लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांना मदत करण्यासाठी 'महाज्योती'च्या माध्यमातून यूपीएससीच्या तयारीसाठी ओबीसी प्रवर्गातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना दिल्लीत पाठवण्याची योजना आहे. उच्च शिक्षण आणि परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससी, एमपीएससी, एसएससी यांसारख्या स्पर्धा परीक्षांच्या कोचिंगसाठी निधी उपलब्ध करण्यावर महाज्योतीचा भर राहणार आहे, असे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### 'महाज्योती' संस्था स्थापनेचा उद्देश

ओबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आणि उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळावी म्हणून बार्टीच्या धर्तीवर संस्था सुरू करण्याचा विद्यार्थ्यांचा आग्रह होता. त्यासाठी त्यांनी आंदोलन केले होते. त्यानंतर राज्य सरकारने महाज्योती स्थापन केली.

### पुणे, नागपूर, बुलढाणा येथे कार्यालय

महाज्योती कार्यान्वित झाल्यानंतर ओबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थ्यांना दिल्लीत जाऊन यूपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करताना आर्थिक मदत मिळू शकणार आहे. सध्या विद्यार्थ्यांना स्वखर्चाने कठीण परिस्थितीत दिल्लीत राहून तयारी करावी लागत आहे. या संस्थेचा अधिकाधिक विद्यार्थ्यांना लाभ मिळावा म्हणून पुणे, नागपूर आणि बुलढाणा येथे विभागीय कार्यालय प्रस्तावित आहेत.

> महाज्योती ही समाजातील मोठ्या वर्गाला दिलासा देणारी संस्था आहे. आमच्या सरकारने संस्था स्थापन केली. विद्यमान सरकारने तातडीने निधीची तरतूद करावी. तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. जेणे करून संस्था विद्यार्थ्यांसाठी योजना सुरू करू शकेल.
>
> -डॉ. संजय कुटे, माजी मंत्री, ओबीसी कल्याण विभाग.

लोकसत्ता Thu, 05 December 2019 https://epaper.loksatta.com/c/46527068

# 'महाज्योती'ला निधी कधी मिळणार?

## ओबीसी विद्यार्थ्यांची मुख्यमंत्र्यांकडे विचारणा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग तसेच, खुल्या प्रवर्गाच्या दुर्बल घटकातील तरुण-तरुणींच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासासाठी स्थापन झालेल्या 'महाज्योती' संस्थेचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी युनायटेड ओबीसी स्टुडंट फेडरेशनने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

अनुसूचित जाती- नवबौद्ध तरुण-तरुणांच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) तर, मराठा, कुणबी, कुणबी मराठा आणि मराठा कुणबीसाठी 'सारथी' ही संस्था कार्यरत आहे. त्याचधर्तीवर महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये अस्तित्वात आली. मात्र, या संस्थेसाठी राज्य सरकारने ना कार्यालय उपलब्ध करून दिले ना निधी. संस्थेकडे मनुष्यबळही नसून कार्यकारी अधिकारीही नाही!

'महाज्योती' अंतर्गत स्पर्धा परीक्षांसाठी मार्चपासून शिकवणीवर्ग सुरू होतात. त्यासाठी विद्यार्थी निवडीची प्रक्रिया जानेवारीमध्ये पूर्ण होणे आवश्यक आहे. मात्र, संस्था निव्वळ कागदावर राहिल्याने पाच हजार ओबीसी विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता पत्रकात नमूद केली आहे. या विभागासाठी मागासवर्गीय अधिकाऱ्याची नियुक्ती करावी अशी मागणीही केली आहे. 'सारथी'चा लाभ मिळवून देण्यासाठी राजकीय नेते पुढाकार घेतात मग, 'महाज्योती' कार्यान्वित होण्यासाठी का प्रयत्न केले जात नाहीत, असा सवाल फेडरेशनचे अध्यक्ष उमेश कोर्राम यांनी केला.

### 'सारथीची स्वायत्तता कायम ठेवा'

सारथीची स्वायत्तता कायम ठेवावी अशी मागणीही फेडरेशनने केली आहे. गेल्या महिन्यात काढलेल्या परिपत्रकामुळे 'सारथी'ची स्वायत्ततेवर गदा येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या मुद्द्यावर खासदार संभाजीराजे पुण्यात शनिवारी लाक्षणिक उपोषण करणार आहेत.

लोकसत्ता Sat, 11 January 2020 https://epaper.loksatta.com/c/47860844

दिनांक १ व ८ फेब्रुवारी २०२० नागपूर- दिल्ली

# 'महाज्योती'चे मुख्यालय नागपुरात

## विभागातील ५०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह

राजेश्वर ठाकरे, लोकसत्ता

**नागपूर :** महात्मा ज्योतिराव फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (महाज्योती) मुख्यालय नागपुरात स्थापन करण्यात येणार आहे. हे कार्यालय सामाजिक न्याय खात्याच्या दक्षिण अंबाझरी मार्गावरील इमारतीमध्ये राहणार आहे.

ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आणि परदेशात उच्च शिक्षणासाठी मदत व्हावी म्हणून महाज्योती या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे मुख्यालय नागपुरात सुरू करण्यात येणार आहे. महाज्योती कार्यान्वित झाल्यावर ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थ्यांना दिल्लीत जाऊन यूपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करताना आर्थिक मदत मिळू शकणार आहे. सध्या विद्यार्थ्यांना स्वखर्चाने कठीण परिस्थितीत दिल्लीत राहून तयारी करावी लागत आहे.

इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागासप्रवर्गातील मुला-मुलींना स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षणाठी सवलतीच्या योजना सुरू करता याव्या म्हणून महाज्योती स्थापन करण्यात आले. या संस्थेतर्फे राज्य लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगतर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले जाणार आहे. या संस्थेचे कार्यालय पुण्याऐवजी नागपुरात राहणार आहे. यासंदर्भात ओबीसी व मदत, पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार म्हणाले, महाज्योतीचे मुख्यालय नागपुरात सामाजिक न्याय खात्याच्या इमारतीमध्ये सुरू केले जाणार आहे. या कार्यालयासाठी १६ कर्मचारी राहणार आहे. तसेच संस्थेला लागणाऱ्या निधी यासंदर्भातील पत्र वित्त व नियोजन खात्याकडे पाठवण्यात आले आहे. पुढील आठवड्यातील मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णय होणे अपेक्षित आहे.

दरम्यान, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या तयारीसाठी ५०० विद्यार्थ्यांची पहिली तुकडी मे महिन्यात जाईल, असे आश्वासन वडेट्टीवार यांनी दिले. या साठीची परीक्षा एप्रिल- मे २०२० ला होणार आहे, असे स्टुडंट्स राईट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष उमेश कोरॉम यांनी सांगितले.

### शिष्यवृत्ती मिळू शकेल

महाज्योतीमुळे राज्यातील ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी प्रवर्गातील एक हजार विद्यार्थ्यांना दिल्लीत स्पर्धा परीक्षेसाठी शिष्यवृत्ती मिळू शकणार आहे. राज्य लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांना आर्थिक दिलासा मिळू शकेल. उच्च शिक्षण आणि परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससीयासारख्या स्पर्धा परीक्षांच्या शिकवणीसाठी महाज्योती निधी उपलब्ध करेल.

लोकसत्ता Sat, 01 February 2020
https://epaper.loksatta.com/c/48554103

लोकमत

# ५०० मराठी विद्यार्थ्यांना मिळणार दिल्लीत कोचिंग

## 'महाज्योती'ची योजना : एप्रिलमध्ये प्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बार्टी आणि सारथीच्या धर्तीवर इतर मागासवर्गीयांसाठी घोषणा करण्यात आलेल्या 'महाज्योती' या संस्थेकडून ५०० मराठी विद्यार्थ्यांना मे महिन्यात दिल्लीत यूपीएससीच्या कोचिंगसाठी पाठवण्यात येणार आहे. त्यासाठी एप्रिल महिन्यात प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

'महाज्योती' संस्थेचे मुख्यालय नागपूरमध्ये असेल. या संस्थेसाठी आवश्यक कर्मचारी आणि निधी याबाबत वित्त व नियोजन विभागाला फाईल पाठवण्यात आल्या आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री विजय वडेट्टीवार यांच्यात बैठकही झाली असून एप्रिलमध्ये परीक्षा होईल, असे आश्वासन वडेट्टीवार यांनी दिले आहे.

सारथीप्रमाणेच महाज्योतीकडून दिल्लीत पाठवण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा १३ हजार रुपये विद्यावेतन, कोचिंगसाठी दोन लाख रुपये, पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाल्यास मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी ५० हजार रुपये आणि मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यास मुलाखतीच्या तयारीसाठी २५ हजार रुपयांची रक्कम देण्यात येणार आहे, अशी माहिती ओबीसी स्टुडंट्स फेडरेशनचे अध्यक्ष उमेश कोरॉम यांनी दिली. बार्टी आणि सारथी या संस्थांकडून दरवर्षी २०० विद्यार्थ्यांना दिल्लीत कोचिंगची सुविधा दिली जाते.

अनुसूचित जाती, मराठा-कुणबी विद्यार्थ्यांप्रमाणेच इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाही दिल्लीत यूपीएससीची तयारी करता यावी यासाठी दिल्लीतील ओबीसी विद्यार्थ्यांची आग्रही मागणी होती. सहा महिन्यांपासून या मागणीचा पाठपुरावा केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश आले आहे.

### निश्चित लाभ होईल

महाज्योतीमुळे ओबीसी प्रवर्गातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना कोचिंगचा लाभ मिळणार असून प्रशासनात मराठी अधिकाऱ्यांचा टक्का वाढण्यासाठी याचा निश्चितच लाभ होणार आहे.

- उमेश कोरॉम,
अध्यक्ष, ओबीसी स्टुडंट्स फेडरेशन

Nagpur Main
Page No. 10 Feb 08, 2020
Powered by: erelego.com

## दिनांक २६ जून व २७ जून २०२० नागपूर

लोकांचे दैनिक
लोकशाही वार्ता
नागपूर, शुक्रवार, २६ जून २०२०

# ओबीसींच्या 'महाज्योती'पुढे अनास्थेचा अंधार

**ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटीसाठी स्थापन केली जाणार होती संस्था : कार्यालयासाठी जागा, आर्थिक तरतूद झाल्यानंतरही अद्याप शुभारंभ नाही**

**लोकशाही वार्ता / नागपूर**

महाराष्ट्र सरकारने ओबीसी, एसबीसी आणि व्हीजेएनटी समुदायांसाठी प्रशिक्षण व करिअर संस्था 'महाज्योती' (महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था) या नावाने संस्था स्थापन करण्याचा निर्णय ८ ऑगस्ट २०१९ रोजी घेतला होता. त्यात या संस्थेचे मुख्य कार्यालय नागपूर येथे सुरू होणार होते. संस्थेसाठी मनुष्यबळ व वित्त (आर्थिक तरतूद) याचेसुद्धा नियोजन झाले आहे, असे वेळोवेळी शासनाकडून सांगण्यात आले आहे. प्रत्यक्षात सरकारी अनास्थेच्या अंधारात 'महाज्योती' चाचपडत असल्याचे वास्तव आहे.

नुकत्याच आलेल्या परीक्षेच्या तारखांनुसार यूपीएससीची पूर्वपरीक्षा ४ आक्टोंबर रोजी तर मुख्य परीक्षा ८ जानेवारीला होणार आहे. एमपीएससीची पूर्वपरीक्षा १३ सप्टेंबरला होणार आहे. त्यासोबच नीट वा आयआयटी-जेईई यांच्यासुद्धा परीक्षेच्या तारखा आलेल्या आहेत. तेव्हा यावर्षीच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणसाठी आर्थिक मदत देणे आवश्यक आहे. कारण हा खर्च लाखांच्या घरात असतो व गरीब ओबीसी विद्यार्थ्यांना अडचणीचा असल्याने भारतीय प्रशासनिक सेवा परीक्षा पास करणे अडचणीचे ठरत आहे. याशिवाय पुढच्या वर्षासाठी युपीएससी, एमपीएससी, बँकिंग, नीट आदी अभ्यासक्रमासाठी ऑनलाइन कोचिंग १ ऑगस्टपासून सुरू होत आहे. तरी हे सर्व लक्ष्यात घेऊन महाज्योती ही संस्था १५ जुलै २०२० पर्यंत सुरू करावी. महाज्योती स्थापनेच्या विलंब झाल्यामुळे ओबीसी समुदायातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तातडीने संस्था सुरू करावी, अशी मागणी केली जात आहे.

### पात्र गुणवंत विद्यार्थी झालेत हतबल

बार्टी, पुणे व सारथी, पुणे या दोन्ही संस्था अनुक्रमे अनुसूचित जाती व मराठा, कुणबी या समुदायासाठी मागील काही वर्षांपासून कार्यरत आहेत. परंतु ओबीसी सामुदायासाठी अशाप्रकारची कुठलीच संस्था सुरू नाही. त्यामुळे ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी समुदायातील विद्यार्थी नैराश्याच्या भावनेतून जात आहेत. महाज्योती संस्था सुरू होण्यास विलंब झाल्यामुळे मागासवर्गीय समाजातील हजारो पात्र गुणवंत विद्यार्थी हतबल झाले आहे.



महाराष्ट्र सरकारकडून महाज्योती स्थापनेला विलंब झाल्यामुळे ओबीसी समुदायातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. एका महिन्याच्या आत संस्था स्थापन न केल्यास ओबीसींसाठी आणखी एक शैक्षणिक वर्ष वाया जाईल. संस्था तातडीने सुरू करावी, या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री, संबंधित खात्याचे मंत्री यांना पाठवले आहे.

**उमेश कोरॉम**
- अध्यक्ष, स्टूडेंट्स राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया

---

**मागणी** | स्टुडंट राईट असोसिएशन ऑफ इंडियाचे साकडे

# 'महाज्योती' संस्था लवकर सुरू करा

**नागपूर ■ प्रतिनिधी**

ओबीसी, एसबीसी आणि व्हीजेएनटी समुदायांसाठी व त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली महाज्योती (महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था) स्थापन केली आहे. परंतु अजूनपर्यंत संस्था सुरु न झाल्याने ओबीसी समुदायातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. एका महिन्याच्या आत संस्था स्थापन न केल्यास ओबीसीसाठी आणखी एक शैक्षणिक वर्ष वाया जाईल. एका महिन्यानंतर संस्था स्थापनेत काहीच अर्थ उरणार नाही. २०२०-२१ साठीच्या स्पर्धा परीक्षेसाठी कोचिंग १५ जुलै ते १ ऑगस्टपर्यंत सुरु होणार आहे. त्यामुळे ही संस्था १५ जुलैच्या अगोदरच ताबडतोब सुरु करा अशी मागणी स्टुडंट राईट असोसिएशन ऑफ इंडियाने महाराष्ट्र सरकारकडे केली आहे.

महाराष्ट्र सरकारने महाज्योती' संस्था स्थापन करण्याचा निर्णय ८ ऑगस्ट २०१९ रोजी घेतला होता. त्याचे मुख्यालय नागपूर येथे सुरु होणार होते. परंतु अद्यापही ही संस्था सुरु करण्यात आली नसल्याने या वर्गातील विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांना अडचणीतून सामोरे जावे लागत आहे.

लवकरच १३ सप्टेंबरला एमपीएससीच्या राज्यसेवेची पूर्वपरीक्षा १३ सप्टेंबर तर यूपीएससीच्या सिव्हिल सेवाची पूर्वपरीक्षा ८ ऑक्टोबर तर मुख्य परीक्षा ८ जानेवारीपासून सुरु होणार आहे. त्यामुळे या वर्षीच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पुढील परीक्षेची तयारी करण्याकरिता आर्थिक मदत देणे आवश्यक आहे. अशावेळी संस्था सुरु झाल्यास विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणीला तोंड देता येणार आहे. त्यामुळे संस्था ही विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी राहणार आहे.

बार्टी पुणे व सारथी पुणे या दोन्ही संस्था अनुक्रमे अनुसूचित जाती व मराठा, कुणबी या समुदायसाठी मागील काही वर्षापासून कार्यरत आहेत, परंतु ओबीसी सामुदायासाठी अशा प्रकारची कुठलीच संस्था नाही. त्यामुळे ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी समुदायातील विद्यार्थी नैराश्याच्या भावनेतून जात आहेत. महाज्योती संस्था सुरु होण्यास विलंब झाल्यामुळे मागासवर्गीय समाजातील हजारो पात्र गुणवंत विद्यार्थी हतबल झाले असल्याचे लक्ष पत्राद्वारे एसआरएआय संघटनेचे अध्यक्ष उमेश कोरॉम यांनी वेधले आहे.

### ऑनलाईन कोचिंग सुविधा द्या

नीट आणि आयआयटी-जेईई या परीक्षेच्या तारखाही जवळच आल्या आहेत. याशिवाय पुढच्या वर्षासाठी यूपीएससी, एमपीएससी, एसएससी, बँकिग, जीआरई, टोफेल, यूजीसी नेट, नीट, आयआयटी अभ्यासक्रमासङ्क्या तारखाही जवळच आल्या आहेत. याशिवाय पुढच्या वर्षासाठी यूपीएससी, एमपीएससी, एसएससी, बँकिग, जीआरई, टोफेल, यूजीसी नेट, नीट, आयआयटी अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन कोचिंग १ ऑगस्टपासून सुरु होत आहे. कोटा, राजस्थानमधील प्रख्यात कोचिंग संस्था १ ऑगस्ट २०२० पासून त्यांचे ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु करणार आहेत. अशा प्रकारे महाज्योतीने जुलै महिन्यात प्रवेश परीक्षा घेणे आवश्यक आहे. विविध शैक्षणिक संस्था ऑनलाईन कोचिंग सुविधा चालवित आहे. त्यामुळे 'महाज्योती'च्या माध्यमातून ऑनलाईन प्रशिक्षण दिले गेले तर कमी खर्च करता, कमीतकमी मनुष्यबळाचा वापर करून ही संस्था सुरु करणे शक्य असल्याचेही एसआरएआयने सरकारचे लक्ष वेधले आहे.

# 'महाज्योती'मध्ये विद्यार्थी प्रतिनिधी नियुक्त करा

**नवी दिल्ली :** इतर मागासवर्ग, विमुक्त, भटक्या जाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महाराष्ट्र सरकारने महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेची घोषणा केली आहे. या संस्थेकडून दिल्लीत ५०० विद्यार्थ्यांना यूपीएससीच्या तयारीसाठी पाठवण्यात येणार आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या समस्या तातडीने दूर करण्यासाठी 'महाज्योती'मध्ये विद्यार्थी प्रतिनिधी नियुक्त करण्याची मागणी दिल्लीतील स्टुडंट्स राईट्स असोसिएशन ऑफ इंडियाने केली आहे.

'महाज्योती'चे कार्यान्वियन सुरळीत पार पाडण्यासाठी निधी, कार्यालय आणि मनुष्यबळ तातडीने उपलब्ध करुन देण्याची मागणीही करण्यात आल्याचे संघटनेचे अध्यक्ष उमेश कोर्राम यांनी केली आहे. महाज्योतीकडून मे महिन्यात ५०० विद्यार्थ्यांना दिल्लीत यूपीएससीच्या तयारीसाठी पाठवण्यात येणार आहे. मात्र, महाज्योतीची नोंदणी होऊन तीन महिने झाले तरी अद्याप पुढील तरतुदी रखडल्या आहेत. महाज्योतीच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर आयएएस अधिकाऱ्याची नियुक्ती करणे, संचालक मंडळाच्या अध्यक्षपदावर माजी सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे आणि संचालक मंडळामध्ये विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून विद्यार्थी संघटनेतील योग्य व्यक्तीची नियुक्ती करणे अशा मागण्या संघटनेकडून करण्यात आल्या आहेत.

New Delhi
Page No. 3 Feb 15, 2020
Powered by: erelego.com



दिनाक २० मार्च २०२० नागपूर

सकाळ

# महाज्योती संचालक मंडळात ९ जण

## विद्यार्थी प्रतिनिधीचा समावेश करण्याची मागणी

**नागपूर, ता. १९ :** महाराष्ट्र राज्यात ओबीसी, व्हीजेएनटी, एनटीडी वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी महाज्योती या स्वायत्त संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. महाज्योती संस्थेच्या संचालक मंडळात ९ जणांचा समावेश राहणार आहे. यात विद्यार्थी प्रतिनिधीचा समावेश करावा, अशी मागणी ओबीसी युवा अधिकार मंचच्या वतीने मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाचे मंत्री विजय वडेट्टीवार यांच्याकडे करण्यात आली.

या ९ जणात सहा शासकीय तर तीन अशासकीय सदस्यांचा समावेश राहणार आहे. उमेश कोर्राम यांना संस्थेच्या संचालक मंडळात सदस्य म्हणून घेण्यात यावे याकरिता ओबीसी युवा अधिकार मंचने मागणी केली आहे. तसेच येत्या ११ एप्रिल रोजी महात्मा फुले जयंतीनिमित्त महाज्योती कार्यालयाची औपचारिक सुरुवात करण्यात यावी, इतर मागासवर्गीय मंडळकडून १ लाख रुपयांचे कर्ज मिळण्याची योजना आहे. परंतु, त्यात २ जामीनदार हे महाराष्ट्र राज्य शासनाचे कर्मचारी असावे, अशी अट आहे. ही कठीण अट रद्द करण्यात यावी, मंडळामार्फत तरुणांना रोजगारासाठी विनाजामीनदार व थेट १० लाख रुपयांचे कर्ज योजनेची तरतूद करावी. इत्यादी अत्यावश्यक मागण्यांबाबतचे निवेदनही ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक निकेश पिने यांच्या नेतृत्वात वडेट्टीवार यांना देण्यात आले.

Nagpur, Nagpur-Today
20/03/2020 Page No. 8